स्वेच्छा सेवानिवृत्ती बाबत.
श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक,
पंचायत समिती कर्जत

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग १
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि/आस्था-३/३४८४७२२/८६२/२०२६
अहिल्यानगर दिनांक :- स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. श्री अशोक दत्तात्रय लोखंडे , कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत यांचा विनंती अर्ज दिनांक १४/०७/२०२६
२. इकडील पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/३४८४७२२/८१८/२०२६ दि २२/०७/२०२६
३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत यांचेकडील पत्र क्र.वशि/आस्था-१/९६६/२०२६ दिनांक ०७/०९/२०२६
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकरी यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा.क्र.साप्रवि-१/रवका/६९६/२०१६ दिनांक १७/०६/२०१६
५. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र ६६

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत यांनी दिनांक १४/०७/२०२६ अर्जान्वये दिनांक ३१/१०/२०२६ रोजी स्वेच्छा सेवानिवृत्ती करणेबाबत विनंती केलेली आहे.

संबंधित कार्यालय प्रमुखांनी श्री अशोक दत्तात्रय लोखंडे , कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत, यांचे विरुध्द कोणतीही चौकशी चालु नाही अथवा प्रस्तावित नाही असे दाखले सादर केले आहे. तसेच जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप.क्रेडीट सोसायटी लि. अहिल्यानगर यांचेकडील रुपये १६,०७,५००/- कर्ज वसुली दर्शविलेली आहे. तरी सदरची कर्ज वसुली त्यांचे सेवानिवृत्ती वेतन विषयक लाभांमधुन करण्यात यावी.

तरी सदरची वसुली करणेच्या अधिन राहुन, नियुक्ती प्राधिकारी हे ऐच्छीक सेवानिवृत्ती मंजूरीस सक्षम प्राधिकरण आहेत. तथापी उपरोक्त संदर्भ क्रमांक ४ चे आदेशान्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा), जिल्हा परिषद अहिल्यानगर या आदेशाद्वारे, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्रमांक ६६ अन्वये श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत, यांची दिनांक ३१/१०/२०२६ रोजी मध्यानोत्तर स्वेच्छा सेवानिवृत्ती मंजूर करीत आहे.

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक .........20260930040168............ असा आहे.

Digitally signed by
RAHUL ASHOK SHELKE
Date: 30-09-2026
14:20:57

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कर्जत

द्वारा व प्रतः- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत

२/- सदर आदेश संबंधीतास बजावुन आदेश बजावले बाबत पोहोच या कार्यालयास सादर करावी. श्री अशोक दत्तात्रय लोखंडे, कनिष्ठ सहाय्यक, पं.स.कर्जत, यांना दिनांक ३१/१०/२०२६ रोजी कार्यालयीन वेळेनंतर स्वेच्छा सेवानिवृत्त करणेकामी आवश्यक कार्यवाही करावी. तसेच सेवानिवृत्त प्रकरणांची त्वरीत पुर्तता करावी.

प्रत - मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर
प्रत - कार्यासन पेन्शन, सामान्य प्रशासन विभाग-१, जि.प. अहिल्यानगर
प्रत - निवड नस्ती

स्वाक्षरी/--
(राहुल शेळके)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद अहिल्यानगर